सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २९०.ठ. क्र. २०८
दि. १०/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्रील भक्ती वेदांत स्वामी प्रभूपाद हे आंतरराष्ट्रीय कृष्णभावना अमृत संघ (इस्कॉन) चे संस्थापक आचार्य होते.सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड जकात नाका पाठीमागे जाणारा रस्ता ते विनायक नगर कोपरा पर्यंतचे रस्त्यास **श्रील भक्ती वेदांत स्वामी महाराज मार्ग** असे नामकरण करण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 259 ठ. क्र. 249
दि. १०.१२.१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवास वृध्दिंगत करणा-या सोलापूर न्यूज चॅनलच्या वतीने शुक्रवार दि.२५/१२/२०१६ रोजी राज्य स्तरीय इन जल्लोष कार्यक्रमांतर्गत भव्य डान्स स्पर्धा घेण्यात येणार आहे. या भव्य दिव्य सोहळयात राज्यभरातील अनेक नामवंत कलाकार स्पर्धक म्हणून सहभाग घेणार आहेत. अशा या अविस्मरणीय कार्यक्रमाचे आयोजन इंदिरा गांधी पार्क स्टेडियमच्या क्रिडांगणावर करण्याचा इन सोलापूर न्युज चॅनल यांचा मानस असून त्यांने सदर क्रिडांगणासाठी योग्य तो शुल्क भरण्यास तयार आहेत व सदर क्रिडांगणावरील पीच खराब होणार नाही याची काळजी घेणार आहेत तरी सदर भव्य दिव्य कार्यक्रमासाठी इंदिरा गांधी पार्क स्टेडियम उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.२९३ ठ. क्र. २८०
दि. ७/७/२०१४ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



हिंदू लमाण समाजाच्या स्मशानभूमिचा विषय हा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असून,प्रभाग क्र.९ मधील शिवाजी नगर (लामण तांडा) येथील गट नं.२७/१ क,२६/२ अ-३,२७/अ,२६/२ अ-१,२६/१ ब-३,२७/२,२७/१,२६/१ ब-२ ही खुली जागा असून,सदर एकलगत असलेल्या जागेपैकी गट नं.२७/१-क या जागेचा गेल्या ३० वर्षापासून सध्या हिंदू-लमाण समाजाच्या लोकांची स्मशानभूमि म्हणून वापर होत आहे.तरी वरील नमूद सर्व गट नंबरचे अधिग्रहण हे मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांनी केलेले आहे.तरी या अधिगृहित केलेल्या जमिनीपैकी २० गुंठे जागेवर हिंदू-लमाण स्मशानभूमि बांधणे संबंधिताचा ठराव मा.सर्वसाधारण सभेसमोर दिनांक ८/७/२०१४ रोजी सादर करणेत आले होते.व त्यास मा.म.न.पा.ठराव क्र.३५ यानुसार मंजूर करणेत आलेले होते.तरी सदर स्मशानभूमिमध्ये अनेक सुविधाची कमतरता असल्याने आवश्यक त्या सुधारणा सोलापूर महानगरपालिकेकडून करुन प्र.क्र.९ मधील हिंदू-लमाण समाज बांधवाच्या ताब्यात देणेस,व तसेच सदर जागा ही सोलापूर महानगरपालिका पर्यटन स्थळ याकरीता आरक्षित असून,सदर जागेपैकी २० गुंठे जागा हे स्मशानभूमि आरक्षणाकरीता मा.शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २९८ ठ. क्र. २५१
दि. ३०/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेचे प्र. आरोग्याधिकारी म्हणून डॉ. जे. एस. आडके या काम पहात आहेत. त्यांची आरोग्याधिकारी या पदावर कायम वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती नसल्याने कामकाजामध्ये व्यत्यय निर्माण होत आहे. त्यामुळे गेल्या तीन वर्षापासून प्र. आरोग्याधिकारी म्हणून कामकाज पाहणारे डॉ. जे. एस. आडके यांचीच त्या पदावर कायम स्वरुपी नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आरोग्य खात्याचे कामकाजामध्ये सुकरता येऊन कामकाजास गती मिळणार आहे व नागरी आरोग्य व शहरातील साफ सफाई स्वच्छता चांगली राहण्यास मदत होणार आहे यांस मान्यता देणेत येत असून सदरची नियुक्ती ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ (१) नुसार मान्यता देणेत येत आहे. मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.२९९ ठ. क्र. २८२
दि. १०/१२/२०१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहर सोलापूर येथील लक्ष्मी विष्णू मिलची जागा (नगर रचना योजना ४ अं.भू.क्र.१६४/१/अ) ही पूर्वी औद्योगिक वापर विभागात समाविष्ट होती. कालांतराने काही कारणास्तव मिल बंद पडली यावर उपाय म्हणून शासनाने कायदा करुन ज्या ठिकाणी मिल बंद झाल्यास जागा मनपाकडे हस्तांतरीत होत असते. मिल बंद झाली असेल तर आवश्यकतेनुसार रहिवास वापराकरिता परवानगी द्यावी व जागेपैकी २५ टक्के जागा मनपाकडे हस्तांतरीत होत असते. अशा २५ टक्के जागेवर मिल कामगारांचे पुनर्वसन करणे क्रमप्राप्त ठरत असल्याने सदर लक्ष्मी विष्णू मिल कामगारांच्या घरासाठी प्रथम प्राधान्याने घरे बांधून मिळणेकामी कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच २०००० स्क्वे. मि. जागा मनपाच्या ताब्यात असून, सदर जागेवर ॲमिनिट सेंटर असे आरक्षण आहे. तरी सदरचे आरक्षण बदलून लक्ष्मी विष्णू मिल कामगारांकरिता घरे बांधण्यासाठी रहिवासी झोमध्ये आरक्षण बदल करणेस व त्याबाबत जरुर ती कार्यवाही करणेस ही सभा मा. महाराष्ट्र शासनास विनंती करीत आहे. ही जागा व घरे लक्ष्मी विष्णू मिल हजेरी पटावरील पात्र कामगार यांनाच देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.208 ठ. क्र....283
दि.19/12/16....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



औद्योगिक वसाहत ,अक्कलकोट रोड व दि सोलापूर इंडस्ट्रीज स्टेट होटगी रोड येथे दिवाबत्तीची सोय करणे कामाचे प्रस्तावात नमुद कारणास्तव तयार करण्यात आलेले पुर्वगणनपत्रक र.रू ३४,८१,४६४/- यास मा. स्थापत्य समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त याचे दि.२८/१०/२०१६ चे टिपणपीप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणे कामी मा. स्थापत्य समिती ठराव क्र.३०८ दि.१०/११/२०१६ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२९४.ठ. क्र. २८४ दि.१९/१/२०१६....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. प्रदिप बाबुगौडा पाटील, राहणार उत्तर कसबा मल्लिकार्जून मंदिराजवळ बाळीवेस सोलापूर यांच्या मेंदूमध्ये रक्ताच्या गाठी झालेले आहेत.सदर आजाराचे उपचार यशोधरा हॉस्पिटलमध्ये चालू आहे.सदर आजाराचे ऑपरेशन लवकरात लवकर करणे अत्यंत आवश्यक आहे.व त्यासाठी फार मोठा खर्च सोसावा लागणार आहे.श्री.प्रदिप पाटील हे बेकार असून,त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची व हालाखिची आहे.तरी त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त अर्थसहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जं.२८५ ठ. क्र....२८५
दि.३०/०५/१६....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्रीमती द्वारका गोविंद कांबळे, (रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) यांचे घर झोपडपट्टी भागात असल्याने दि. २०-७-२०१६ रोजी झालेल्या जोरदार अतिवृष्टीमुळे संपूर्ण घर पडले असून मोठया प्रमाणावर संसार उपयोगी साहित्य नष्ट झालेली आहे. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांना पुन्हा संसार उभारणे करिता भरीव आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. तरी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत-जास्त आर्थिक मदत मिळण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २९२ ठ. क्र. २८६
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते व आंबेडकरी विचाराचे गाडे अभ्यासक मा.आयु.दत्ता गायकवाड यांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण होत असून,या निमित्ताने त्यांच्या आयुष्यातील या अमृतमहोत्सवी सोहळयाचे निमित्त साधून त्यांचा महानगरपालिकेच्या वतीने यथोचित सत्कार करुन त्यांचा गुणगौरव करणेस,मान्यता देणेत येत आहे.

तसेच श्री. सिध्देश्वर देवस्थानचे पुजारी व प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी सदस्य श्री. बसवराजशास्त्री हिरेमठ यांचाही महोत्सव असल्याने त्यांचाही महानगरपालिकेच्या वतीने यथोचित सत्कार करुन त्यांचा गुणगौरव करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. २७७ ठ. क्र. २८७
दि. ३०/१२/१६ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्रमांक ३१ रामवाडी परिसरात विहीरीवरुन पीव्हीसी पाईप लाईन घालणेकामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम शाकंबरी कन्स्ट्रक्शन यांचे नांवे असलेले सदरचे काम रद्द करुन त्याऐवजी मक्तेदार केजीएन कन्स्ट्रक्शन यांचेकडून एस्टीमेट दराने (पूर्वगणनपत्रक रु. ९,९८,७३९/-) कामाची तातडीची नितांत गरज पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरचे काम करुन घेणेत आलेले असून, तसेच सदरची बाब मा. स्थायी समिती व मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६८, दि. २१-१०-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.253 ठ. क्र. 288
दि. 20/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ४५ मध्ये स्नेहसंवादनगर याठिकाणी (म्हाडा कॉलनी) येथे खासदार निधीतून बांधण्यात आलेल्या सभागृहास तेथील समाजसेवक **कै. प्रसाद (बाबू) पवार सभागृह** असे नामकरण करणेस, त्याप्रमाणे नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ 295 ठ. क्र. 299
दि. 30.05.2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र.४१ मधील नई जिंदगी येथील मरहबा हॉलच्या समोरील चौकास मिसाईल मॅन **डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका